# मंत्रिमंडळ निर्णय
## १४ सप्टेंबर २०११
## (मंत्रिमंडळ बैठक क्र. ४३ )

**मंत्रिमंडळ निर्णय :** दिनांक : १४ सप्टेंबर, २०११

मुंबई, दि. १४ : आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

### ई-प्रशासन धोरणास मान्यता

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासनाच्या सर्व सेवा माफक दरात प्रभावीपणे पारदर्शकरित्या आणि जलदगतीने सर्वसामान्य माणसाला देण्यासाठी राज्याच्या ई-प्रशासन धोरण-२०११ ला राज्यमंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. या धोरणानुसार शासनाच्या सर्व सेवा सेतू आणि महाईसेवा केंद्रामार्फत देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य हे ई-प्रशासनाच्या अंमलबजावणीत अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या ई-प्रशासन धोरणाबाबतचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ.विजय भटकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने तयार केलेल्या मसुद्याच्या आधारे राज्याचे ई-प्रशासन धोरण तयार करण्यात आले आहे.

राज्याचे ई-प्रशासन धोरण माहिती आणि संगणक तंत्रज्ञानाचा पाया राहील. हे धोरण प्रशासन प्रक्रियेत पारदर्शकता आणि माहिती मिळविण्याची सुलभता यावर भर देईल. त्याचबरोबर एम (मोबाईल) प्रशासनाकडे राज्याची वाटचाल राहील. नागरिकांना विविध सेवा ऑनलाईन पध्दतीने कमीत कमी दरात पुरविण्यात येतील. शासनाचे सर्व कामकाज अधिक कार्यक्षम आणि कागदरहित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहील.

राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत मिळणाऱ्या सर्व संस्थांना तसेच भागिदारी किंवा संयुक्त संस्थांना आणि कंपन्यांना हे धारेण लागू राहिल. शासनाने विविध विभाग या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्रम हाती घेतील. या कार्यक्रमामध्ये बायोमेट्रिक ओळख पध्दतीवर आधारित युआयडीचा वापर करण्यात येईल.

ई-प्रशासन धोरणामध्ये मराठी ही प्रथम आणि अनिवार्य भाषा राहिल. ई-प्रशासनाच्या विविध प्रकल्पासाठी अत्याधुनिक संगणकीय संरचनेचा वापर केला जाईल. नागरिकांना शासनाच्या विविध सेवा घरपोच प्रदान करण्याबाबत विविध मार्गांचा अवलंब करण्यात येईल. याद्वारे मोबाईलवर आधारित आर्थिक देवाणघेवाण कार्यक्रम राबविण्यात येईल. नागरिकांना संगणकीय पध्दतीने सेवा देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक सेवा अनिवार्य इलेक्ट्रॉनिक प्रदानता अधिनियम अंमलात आणण्यात येईल. शासनाच्या सर्व प्रमुख केंद्रांना एकमेकांना जोडण्यासाठी सुरक्षित महाजाल सेवा पुरविण्यात येईल. शासनाकडून द्यावयाच्या सेवांसाठी स्टेट डाटा सेंटर उभारले जाईल.

राज्य शासन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सेवा याची निर्मिती करेल. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आधारे क्षमतांच्या उभारणीसाठी सरकारी आणि खाजगी भागीदारीला प्रोत्साहन दिले जाईल.

राज्य शासनाचे सर्व विभाग आपल्या अंदाजपत्रकाच्या ०.५ टक्के रक्कम ई-प्रशासनासाठी आरक्षित करतील. या तरतुदींचा मुख्य उद्देश नागरी सुविधा संगणकावर देणे आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा असेल.

०००००

## मिहान व अन्य विशेष आर्थिक क्षेत्रांच्या विकासकांना
## तसेच घटकांना आर्थिक सवलती

केंद्र शासनाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम-२००५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या मिहान व अन्य विशेष आर्थिक क्षेत्रांच्या विकासकांना तसेच घटकांना आर्थिक सवलती देण्याबाबतच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

विशेष आर्थिक क्षेत्राचा जलद विकास व्हावा तसेच अन्य राज्यांच्या तुलनेत गंुतवणूकदारांना आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात सध्या विधानसभेत मान्यतेसाठी दाखल केलेले राज्य आर्थिक विशेष क्षेत्र विधेयक-२०१० हे चर्चेसाठी प्रलंबित आहे.

या विधेयकास विधिमंडळाची व त्यानंतर पुन्हा केंद्र शासनाची मान्यता मिळेपर्यंतच्या कालावधीत किंवा २५ वर्षे यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरिता विकासकांना तसेच घटकांना आर्थिक सवलती देण्यात येतील.

**या सवलती पुढीलप्रमाणे आहेत :-**

- विशेष आर्थिक क्षेत्रातील विकासकांना तसेच घटकांना त्यांच्या खरेदीवर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या मूल्यवर्धित कराचा पूर्ण भरणा केल्यानंतर त्याचा कालबद्ध पद्धतीने परतावा देण्यात येईल.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या अकृषिक आकारणीतून सूट देण्यात येईल.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या गौण खनिजांच्या स्वामित्वधन आकारणीमधून सूट देण्यात येईल.

राज्यात मिहानसह आतापर्यंत एकूण ११७ विशेष आर्थिक क्षेत्रांना केंद्र शासनाकडून तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ६३ विशेष आर्थिक क्षेत्र अधिसूचित झाले असून त्यापैकी २४ विशेष आर्थिक क्षेत्र कार्यान्वित झाले आहेत. यामध्ये ६४ घटक सुरू झाले आहेत. त्यात १७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ८६ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे.

या निर्णयामुळे राज्यात गुंतवणूकदार आकर्षित होऊन राज्याच्या एकूण निर्यातीवर चांगला परिणाम होणार आहे.

०००००

## टिळक महाराष्ट्र विद्‌यापीठातील
### शिक्षकीय पदांना सहावा वेतन आयोग लागू

पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील १७ शिक्षकीय पदांना सहावा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे १७ शिक्षकीय पदांसाठी एकूण एक कोटी १२ लाख ९१ हजार ५८० रुपये एवढा वार्षिक आर्थिक भार पडेल. सद्यास्थित १० पदे भरलेली असून, त्यासाठी ६१ लाख ७० हजार ८४४ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

१ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील थकबाकी अदा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. थकबाकी पोटी २८ लाख ६९ हजार ६०० रुपये इतकी रक्कम अदा करावी लागणार आहे. त्यापैकी ८० टक्के म्हणजेच २२ लाख ९५ हजार रुपये एवढी रक्कम केंद्र शासनाकडून प्राप्त होणार असून, राज्य शासनावर २० टक्के प्रमाणे केवळ ५ लाख ७४ हजार रुपये एवढा आर्थिक भार पडणार आहे.

००००

## मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा
## अधिकार नियमावली करण्याचा निर्णय

बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार या केंद्र शासनाच्या अधिनियमानुसार राज्याची नियमावली तयार करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

केंद्र शासनाने बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ राज्यात १ एप्रिल २०१० पासून लागू केला. त्या अंतर्गत राज्यात नियमावली तयार करण्यात आली. या नियमावलीत काही मुद्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाची व्याख्या पहिली ते आठवी अशी करण्यात आली आहे. खाजगी शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये ७५ टक्के पालकांचा सहभाग राहील. तर उर्वरित २५ टक्के सदस्य हे स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनिधी, व्यवस्थापनाचे सदस्य, मुख्याध्यापक, वरिष्ठ शिक्षक, शिक्षण तज्ञ किंवा बालविकास तज्ञ यांच्यामधून निवडले जातील. त्या त्या शाळेतील व्यवस्थापनाचा प्रतिनिधी अध्यक्षपदी राहील.

शासन किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या शाळेच्या बाबतीत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बालकांचे माता आणि पिता यांच्यामधून निवडण्यात येतील. खाजगी शाळेमध्ये वंचित आणि दुर्बल घटकांना २५ टक्के मुलांना प्रवेश देणे आवश्यक राहील. त्यांची कार्यपध्दती आणि प्रतिपूर्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. राज्यामध्ये Thr Right of Children to Free and Compulsory Education Rules, २०११ प्रसिध्द करण्यास आणि अंमलात आणण्यास मान्यता देण्यात आली.

केंद्र शासनाचा बालकाना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम शासनाने राज्यात लागू केला आहे. त्यानुसार त्यासाठी येणाऱ्या अधिक खर्चाबाबत आवश्यकतेप्रमाणे स्वतंत्रपणे नियोजन आणि वित्त विभागाच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येईल.

००००० 

## युवराज वाल्मिकीला दहा लाख रूपयांचे पारितोषिक

चीनमध्ये नुकत्याच झालेल्या आशियाई चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत विजेतेपद पटकाविणाऱ्या भारतीय हॉकी संघात उज्ज्वल कामगिरी करणारा महाराष्ट्रातील खेळाडू श्री. युवराज वाल्मिकी याला दहा लाख रूपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरव करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

क्रीडा स्पर्धांमध्ये राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार श्री. वाल्मिकी यांना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत विचार करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

यापुर्वी राष्ट्रकुल स्पर्धा, राष्ट्रकुल युवा स्पर्धा आणि एशियन गेम्स् या स्पर्धांमध्ये सुवर्णपदकप्राप्त महाराष्ट्रातील खेळाडूंना दहा लाख रूपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.

०००००